**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सायप्रस, कॅनडा आणि क्रोएशिया या देशांच्या दौऱ्यावर रवाना
- नवीकरणीय उर्जेद्वारे २०३० या वर्षापर्यंत ५०० गिगावॅट उर्जानिर्मिती करण्याचं लक्ष्य असल्याचं नवीन आणि नवीकरणीय उर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांचं प्रतिपादन
- डब्ल्यू टी टी कंटेन्डर स्कोप्जे टेबल टेनिस स्पर्धेत भारताच्या मानव ठक्कर आणि मानुष शहा यांचा अंतिम फेरीत प्रवेश

**आणि**

- उत्तराखंडमध्ये हेलिकॉप्टर कोसळून झालेल्या अपघातात सात जणांचा मृत्यू

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज सकाळी सायप्रस, कॅनडा आणि क्रोएशिया या देशांच्या दौऱ्यावर रवाना झाले. सीमापार दहशतवादाविरोधातल्या भारताच्या भूमिकेला दिलेल्या भक्कम पाठिंब्याबाबत आभार मानायची संधी सायप्रस, कॅनडा आणि क्रोएशिया या देशांच्या दौऱ्यामुळे मिळणार असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दौऱ्यावर रवाना होण्याआधी सांगितलं. सर्व प्रकारच्या दहशतवादाशी कसा सामना करायचा याबाबत अधिक सुस्पष्टता आणण्याकरताही हा दौरा उपयुक्त ठरणार असल्याचं ते म्हणाले. व्यापार, गुंतवणूक, सुरक्षा, तंत्रज्ञान आणि मनुष्यबळाची देवाणघेवाणही या दौऱ्यामुळे शक्य होणार असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. सायप्रस हा भूमध्यसागरीय प्रदेशातला आणि युरोपीय महासंघातला एक जवळचा मित्र आणि महत्त्वाचा भागीदार असल्याचं ते म्हणाले.

कॅनडा इथं होणारी जी-७ शिखर परिषद जागतिक समस्यांवर आणि आणि विशेषत: जगाच्या दक्षिणेकडच्या देशांच्या समस्यांवर विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी असेल, अशी माहिती प्रधानमंत्र्यांनी दिली आहे.

**<><><><>**

नवीकरणीय उर्जेद्वारे २०३० या वर्षापर्यंत ५०० गिगावॅट उर्जा निर्मिती करण्याचं लक्ष्य भारतासमोर आहे, असं प्रतिपादन केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय उर्जा मंत्री प्रल्हाद जोशी

